म्हाडा
MHADA

उपमुख्य अधिकारी / पणन विभाग,
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई
कक्ष क्र.२४०, पहिला मजला, गृहनिर्माण भवन (म्हाडा) कलानगर वांद्रे (पूर्व) मुंबई-५१

==========================================

जा.क्र.उमुअ(पणन)/मुं.मं./सोडत/मुदतवाढ/ ४५११/२०
दिनांक : २३/१२/२०२०

# जाहिर सुचना

## मुंबई मंडळाच्या सर्वसाधारण सदनिका सोडतीमधील पात्र लाभार्थ्यांना विक्री किंमत भरण्याकरिता मुदतवाढ देणेबाबत.

---

कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय स्तरावर व राज्यस्तरावर विविध उपाययोजना राबविण्यात सुरुवात केली आहे. त्याच अनुषंगाने मा.उपाध्यक्ष तथा मु.का.अ./ प्रा यांच्या मान्यतेने मुंबई मंडळातील सर्वसाधारण सदनिका सोडत यांना दिनांक १५/१२/२०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. परंतु कोरोना महामारीमध्ये ब-याच लाभार्थ्यांनी आर्थिक अडचणीमुळे मुदतवाढीची मागणी केली होती. त्या विचारात घेऊन मा.उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्रा. यांच्या मान्यतेने खालीलप्रमाणे मुबई मंडळातील सोडतीतील लाभार्थ्यांना मुदतवाढ देण्यात येत आहे.

- मुंबई मंडळाच्या सर्वसाधारण सदनिका सोडत २०१९ मधील शेल टॉवर, सहकार नगर चेंबुर येथील संकेत क्र.४०६,४०७,४०८,४०९ व ४१० तसेच सदनिका सोडत २०१८ मधील महावीर नगर येथील संकेत क्र. ३५५ व सोडत २०१७ मधील चारकोप कादिवली येथील संकेत क्र. ३४४,३४५,३४६,३४७,३४८ व ३४९ या सोडतीमधील पात्र लाभार्थ्यांना विक्री किंमत भरण्याकरीता प्रचलित प्रलंबित व्याजासह वाढीव मुदतवाढ दिनांक ३१/१२/२०२० पर्यंत देण्यात येत आहे.
- मुंबई मंडळातील सोडतीमधील लाभार्थ्यांना तात्पुरते देकारपत्र निर्गमित केलेल्या सोडत २०१७ मधील संकेत क्र. ३४०,३४१,३४२ व ३४३ (गेस्ट हॉऊस प्लॉट, उन्नतनगर गोरेगांव) या योजनेतील सदनिकांबाबत विक्री किमंत भरण्याकरिता दिनांक २८/०२/२०२१ पर्यंत किंवा सदर गाळे मंडळाच्या ताब्यात येईपर्यंत यापैकी जे अगोदर होईल त्या कालावधीपर्यंत बिनव्याजी मुदतवाढ देण्यात येत आहे.

**डॉ. योगेश म्हसे**
मुख्य अधिकारी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
मुंबई